# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University
**(formerly University of Pune)**

## नोंदणीकृत पदवीधर मतदार संघातून अधिसभेवर निवडणूक
## (अ) पदवीधरांच्या नोंदवहीत नोंद करणे
## (ब) नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नाव समाविष्ट करणे

### जाहीर प्रकटन

विद्यापीठाच्या अधिसभेचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने, सर्व संबंधितांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम २८(२)(न)(28(2)(t)) व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर **(Registered Graduates)** अधिसभेवर **(Senate)** निवडून द्यावयाचे आहेत. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी तसेच मतदार यादी तयार करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर **online** पद्धतीने **बुधवार, दिनांक १५ जून, २०२२ ते सोमवार, दिनांक ०४ जुलै, २०२२** या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १३१(१) नुसार खालील व्यक्ती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर होण्यास पात्र असतील :

**अ)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पदवीधर;

**ब)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रात (पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा) वास्तव्यास असलेल्या, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी मुंबई विद्यापीठाचे पदवीधर असलेल्या व्यक्ती (ज्यांनी मुंबई विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र धारण केलेले आहे अशा व्यक्ती) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविण्यास पात्र आहेत. त्यानुसार असे जे मुंबई विद्यापीठाचे पदवीधर नाव नोंदवू इच्छित असतील त्यांनी अर्जासोबत स्वतः साक्षांकित केलेली खालील दस्तऐवजची प्रत संकेत स्थळावर अपलोड करावीत :

**(एक)** पदवी प्रमाणपत्र (उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड., बी.ई. इत्यादी);

**(दोन)** निवासाचा पुरावा (आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक पुरावा;

**(तीन)** मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिवांचे नोंदणीकृत पदवीधर असल्याबद्दलचे / नसल्याबद्दलचे (जे लागू असेल ते) प्रमाणपत्र. अशा व्यक्तींची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे नोंदणी झाल्यानंतर मुंबई विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणून असलेली नोंद आपोआप संपुष्टात येईल.

ज्या व्यक्तीने नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविण्यासाठी वर नमूद केलेल्या पध्दतीप्रमाणे अर्ज केला असेल त्या व्यक्तीचे नाव, अर्जातील विनंतीनुसार मतदार यादीत समाविष्ट केले जाईल.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम १३१(२) नुसार खालील व्यक्ती नाव नोंदणीसाठी अपात्र समजण्यात येतील :

जी व्यक्ती, -

**क)** विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल; किंवा

**ख)** अमुक्त नादार असेल; किंवा

ग) ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जिला दोषी ठरविण्यात आली असेल;

घ) लबाडीच्या मार्गाने एखादी पदवी मिळविली असेल; किंवा

ड) राज्यात कायद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर असेल;

**३. ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :**

अ) ऑनलाईन अर्ज भरतांना पदवीधरांनी प्रथम अर्ज भरण्यासंबंधीच्या सर्व सूचना व्यवस्थित वाचाव्यात.

ब) ज्या व्यक्तीस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नव्याने नाव नोंदवावयाचे असेल त्या व्यक्तीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावरील **Online Registrations→ Registered Graduates→ New Registration** या लिंकमार्फत **online** पद्धतीने माहिती भरावी व नोंदणी शुल्क **रु.२०/- (रु.वीस फक्त) ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे (Net Banking/Credit Card/Debit Card/UPI)** भरुन अर्जासोबत स्वतः साक्षांकित केलेली खाली नमूद केलेली दस्तऐवजची प्रत संकेत स्थळावर अपलोड करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा :

(एक) पदवी प्रमाणपत्र (उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड., बी.ई. इत्यादी);

(दोन) निवासाचा पुरावा (आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक पुरावा;

(तीन) नाव बदलले असल्यास शासकीय राजपत्राची किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

**क) ज्या पदवीधरांनी यापूर्वीच आपली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी केलेली असेल, अशा व्यक्तींनी मतदार यादीत नावाचा समावेश करण्याकरिता विद्यापीठाच्या election.unipune.ac.in** या संकेतस्थळावरील **Online Registrations→ Registered Graduates→ Already Registered Graduates** या लिंकमार्फत **online** पद्धतीने माहिती भरावी व खालील नमूद केलेली दस्तऐवजची प्रत संकेत स्थळावर अपलोड करुन अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा :

(एक) **पदवी प्रमाणपत्राची साक्षांकित/स्वयं साक्षांकित प्रत. (उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड., बी.ई. इत्यादी)**

(दोन) **नावात बदल असल्यास** - शासन राजपत्राची / विवाह नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित/स्वयं साक्षांकित प्रत.

(तीन) **पत्त्यामध्ये बदल असल्यास** - आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी एका पुराव्याची साक्षांकित/स्वयं साक्षांकित प्रत;

**ड) नव्याने नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी करु इच्छिणाऱ्या अथवा यापूर्वी नोंदणीकृत पदवीधर असलेल्या व मतदार यादीत नाव समाविष्ट करु इच्छिणाऱ्या व्यक्तींनी वरील तीन(ब)आणि(क) मध्ये नमूद केलेले (यापैकी जे लागू असेल ते) दस्तऐवज आणि त्यांचे छायाचित्र (Photo) व स्वाक्षरी (Signature) स्कॅन करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना अपलोड करणे आवश्यक आहे.**

४. नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये नोंद होण्यासाठी विहीत ऑनलाईन पध्दतीव्यतिरिक्त इतर आलेले अर्ज, अपूर्ण अर्ज तसेच आवश्यक ती कागदपत्रे (पदवी प्रमाणपत्र) न जोडलेले अर्ज नाकारले जातील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. या संदर्भातील निर्देश, प्रकटन, निवडणूक कार्यक्रम, निवडणूक सूचना, मतदार याद्या, इ. बाबी फक्त विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील. सबब, विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील संबंधित माहिती सर्व संबंधितांनी वेळोवेळी ज्ञात करुन घेणे आवश्यक आहे. या संदर्भात इतर कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/१२
दिनांक : १३/०६/२०२२